# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/११/२०२५ (सोमवार )**

---

## अवैध रित्या अंमलीपदार्थ ब्राउन शुगर बाळगऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद, ४५.७८ ग्रॅम ब्राउन शुगर जप्त नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक २३/११/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक पेट्रोलींग करीत असतांना पोलीस स्टेशन अरोली हद्दीत ग्रामपंचायत खात समोरुन स्मशान घाटकडे जात असतांना एक इसम पोलीस वाहन पाहुन संशयास्पदरित्या पळुन जावु लागला. पोलीसांनी त्यास थांबवुन विचारपुस केली असता त्याचे **नाव हेमंत नारायण खांडेकर, वय. ३७ वर्षे, धंदा— मजुरी, रा. गौतम नगर, वाजपेयी वार्ड, गोंदीया ह.मु शर्मा यांचे घरी , मानवता नगर , नागपुर** असे असल्याचे समजले. त्याला अधिक विचारना केली असता त्यांने उडवाउडविचे उत्तरे दिली. पोलीसांनी पंचासमक्ष नमुद आरोपीची झडती घेतली असता त्यांचे ताब्यात फिक्कट कथ्या रंगाची पावडर असलेला ब्राउन शुगर अंमली पदार्थ मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष **४५.७८ ग्रॅम ब्राउन शुगर किमंत ४,५७,८००/— रूपये** आणि एक ॲड्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/— रूपये असा एकुण ४,६७,८००/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन अरोली येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे. दिनांक २६/११/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**



# सावनेर पोलीस स्टेशन हद्दीतील अल्पवयीन बालक भावेश विनोद खोडणकर याचे बेपत्ता/ अपहरण प्रकरणी यशवंत बाबा झोपडपटटी येथे पोलीस अधिकारी आणि इतर प्रशासकिय अधिकारी यांची भेट

पोलीस स्टेशन सावनेर :— दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी १०/४५ वा. सुमारास फिर्यादी नामे. सौ. बबीता विनोद खोडणकर, वय ३६ वर्ष,रा.वार्ड क्र.०६ यशवंतबाबा झोपडपटटी, सावनेर ता.सावनेर जि.नागपुर, यांचा अल्पवयीन मुलगा **भावेश विनोद खोडणकर,वय १३** वर्षे,रा.वार्ड क्र.०६ यशवंत बाबा झोपडपटटी,सावनेर ता.सावनेर जि.नागपुर हा शाळेतील बस मध्ये बसुन शाळेत गेला,परंतु शाळेत न जाता कुठे तरी निघुन गेलेला आहे. नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम १३७(२)बी.एन.एस.२०२३ गुन्हा नोंद आहे.

सदर प्रकरणी पोलसांनी तात्काळ तपास करीत सदर बालाकाचा शोध सुरू केला. अपहृत मुलाचे शोधार्थ बालकाचे नातेवाईक व मित्राकडे विचारपुस केली असता,त्याचाकडे आला नसल्याचे समजल्याने,सावनेर बस स्टॉप येथे लावण्यात आलेले सी.सी.टी.व्ही. फुटेज बघीतले असता, बस मध्ये बसुन नागपुर, येथे गेला. त्यानंतर रेल्वे स्टेशन नागपुर येथील सी. सी.टी.व्ही. फुटेज वरून तो रेल्वे मध्ये बसुन दिल्ली कडे निघुन गेल्याचे समजले आहे. मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण,यांचे आदेशान्वये अल्पवयीन बालकाचे शोधार्थ दोन पोलीस पथक तयार करून एक पथक अल्पवयीन मुलाचे नातेवाईकांसह स्टेशन टु स्टेशन शोध घेण्याकरीता रवाना करण्यात आले आहे. तसेच एक पथक दिल्ली करीता रवाना करण्यात येत आहे. सदर निघुन गेलेला बालकाच्या नातेवाईकांना श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक,उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री रमेश बरकाते,उपविभागीय दंडाधिकारी,श्री खलाटे, तहसिलदार श्री. अक्षय पोयाम यांनी त्यांचे घरी जावुन भेट दिली. पोलीस सदर अपहृत बालकाचा शोध घेत आहेत.

**अल्पवयीन अपहृत बालकाचे वर्णन :—** वय १३ वर्ष, रंग— गोरा, उंची —५ फुट, अंगात पॉढरा शर्ट, खाकी रंगाचा पॅन्ट, शाळेचा लाल रंगाचा जॉकेट, पाठीवर काळया रंगाची बॅग, पायात शाळेचे काळया रंगाचे बुट,डाव्या हातात टंच घडी, पाठीवर लालसर रंगाचा डांग, लाल रंगाचा बास्केट (टिफीन बॅग)

नमुद अपहृत बालकांबाबत माहीती प्राप्त झाल्यास खाली संपर्क क्रमांकवार संपर्क साधाव

**पोलीस निरीक्षक श्री उमेश पाटील, पोलीस ठाणे सावनेर**

**९८२२५११७५१**

**पोउपनि श्री बाळु जी.राठोड, पोलीस ठाणे सावनेर**

**८०८७८०६८१०**



**अपहृत बालक भावेश विनोद खोडणकर**



## पोलीस ठाणे पारशिवणी हद्दीतील मौजा शिलादेवी शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक २३/११/२०२५ रोजी पारिशवणी पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा शिलादेवी शिवार येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन धाड टाकुन **आरोपी नामे अमित नयनलाल नैकाम, वय ३० वर्षे, रा. शिलादेवी, ता पारशिवनी,**याचेवर कारवाई करत घटनास्थळावरून १) २५० लीटर मोहाफुल दारू कीमंती २५०००/— रूपये असा मुद्देमाल मळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला



## केळवद आणि सावनेर येथील महीलांसोबत कोणताही आर्थिक फसवणुक झालेली नसलेबाबत...

दिनांक २३/११/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात दोन महीलांच्या बॅक खात्यातुन रक्कम परस्पर विड्रसल या शिर्षकाखाली बातमी प्रसिध्द झालेली असुन सदर प्रकरणाची  सविस्तर माहिती अशी आहे की, दोन महीलांच्या बॅक खात्यातुन पैसे विड्रॉल झाल्याबाबत तक्रार केळवद आणि सावनेर पोलीस स्टेशन येथे प्राप्त झाली होती. सदर तक्रारींची पोलीसांनी चौकशी केली असता नमुद महीलांनी बॅकेव्यतिरीक्त इतर लोन घेतलेले होते. पैसे कपातीसाठी ऑटो डेबीट सेट केले असल्यामुळे त्यांच्या खात्यात पैसे येताच त्यांचे लोन चा हप्ता कपात झाल्याची माहीती संबधीत बॅकेकडुन प्राप्त झाली. नमुद महीलांसोबत कोणताही कोणतीही आर्थिक फसवणुक झालेली नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे,दारू बाळगुण विक्री तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १९ गुन्हे नोंद.

दिनांक २३/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, सडवा तसेच इतर साहीत्य असा **एकुण १,७४,७२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे १ गुन्हा नोंद आहे.पोलीस स्टेशन नरखेड येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे.पोलीस स्टेशन सावनेर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे ३ गुन्हा नोंद आहे . पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापुर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे २ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १९ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत २४० मिली देशी दारू, १४१५ लीटर मोहाफुल दारू, ९४० लिटर सडवा तसेच इतर साहीत्य असा एकुण १,७४,७२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने